डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला अंतीम संशोधन आराखडा

"जिल्हा अधिकारी कार्यालयातील जनसंपर्क : एक अभ्यास"
(विशेष संदर्भ लातूर जिल्हा)

संशोधक

बिडवे तुळशीदास शिवाजीराव

मार्गदर्शक
डॉ. प्रतिभा पाटील
प्राध्यापक,
लोकप्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

जून - २०१५

आधुनिक युगात लोकशाही शासन व्यवस्थेत नागरिक आणि प्रशासन यांच्यात चांगले संबंध निर्माण झाले आहेत. पुर्वी पोलीसी राज्यात प्रशासक व जनता यांच्यात मालक व नोकर असे संबंध होते ते आज समाप्त झाले आहेत. प्रशासकाचा प्रत्येत आदेश लोकांना स्विकारावा लागत असे. प्रशासक व जनता यांच्यात कोणत्या प्रकारचे सूत्र नव्हते. सामान्य लोकात प्रशासनाविषयी भीतीची भावना होती. त्यामुळे पोलिसी राज्यात सरकारी कार्याविषयी उदासिनता होती.

आज लोकशाहीच्या विकासातून लोक-कल्याणकारी राज्य उदयास आल्याचे दिसते. लोक-कल्याणकारी राज्यात लोकांचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी शासनव्यवस्थेवर येते. लोक कल्याणकारी राज्यांना अनेक कल्याणकारी योजना राबवाव्या लागतात. या योजनांची यशस्विता ही लोकसहभागावर अवलंबून असते.

जनता प्रशासनाच्या अत्यंत जवळ आली आहे. लोक पोलिस प्रशासनाप्रमाणे कोणताही आदेश स्विकारायला तयार नाहीत. लोकांची टिकात्मक प्रवृत्ती वाढली आहे. टिकात्मक प्रवृत्तीमुळे प्रशासनाची कार्ये अवघड बनली आहेत. प्रशासनाला पटवून द्यावे लागते की, प्रशसनाची कार्ये लोकांसाठी किती महत्वाची आहेत. हे तेव्हांस शक्य होणार आहे, जेव्हां प्रशासन आणि जनता याच्यात संपर्क साधला जाईल. सामान्य मानसात प्रशसनाविषयी अविश्वास असेल तर तो प्रशासनाने दूर केला पाहिजे. प्रशासन लोकांचा गैरसमज व अफवांना बळी पडू शकते. जनमत प्रशासन विरोधी बनू शकते. लोकशाही व्यवस्थेतील शासन लोकांच्या मतांची अवहेलना करून टिकू शकत नाही. प्रशासन व जनता यांच्यातील मतभेद, परस्पर विरोध समाप्त करण्यासाठी प्रशासनाला जनतेसोबत आधुनिक युगात जनसंपर्काला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

जनसंपर्काची पार्श्वभूमी :

२१ व्या शतकात प्रशासन, व्यवस्थापनशास्त्र, राजकारण, विज्ञान तंत्रज्ञानाबरोबरच माहिती तंत्रज्ञानने देखील झेप घेतली आहे. प्रचार, प्रसिद्धी व जाहिराती

यांच्याद्वारे प्रशासकीय संघटना व संस्था आपली प्रतिमा उंचावत आहेत. जनता आणि प्रशासन यांच्यामध्ये परस्पर सामंजस्य निर्माण करून ते टिकविण्याचे काम जनसंपर्क करते. प्रचार, प्रसिद्धी, लोकव्यवहार, माहिती देणे, जाहिरात कला व सर्वांचे एकत्रित, सुव्यवस्थित व सुसंस्कृत रुप म्हणजे जनसंपर्क, जनमताला सर्वोत्परी मानल्यामुळे जनसंपर्काचे महत्व अधिक आहे.

जगात लिपीच्या उदयाबरोबरच जनमाणसाला एकत्र आणण्याचा प्रघात सुरु झाला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याचबरोबर वार्तालाप, राजदूतांची नियुक्ती, ताम्रपट, शिलालेख, प्रतिक, चिन्हे, पदयात्रा, मोर्चे यामुळे जनसंपर्काच्या कार्याला हातभार लागला पहिल्या एलिझाबेथ राणी जेव्हां इ.स. १५५८ मध्ये ती सत्तेत आली तेव्हां जनतेशी संपर्क ठेवण्याचे काम आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले.

जगात सर्वप्रथम जनसंपर्काचा विकास खऱ्या अर्थाने अमेरिकेत झाला जनसंपर्काचा पहिला संघटित व औपचारीक प्रयत्न १९११ साली लॉयड जॉर्ज यांनी राष्ट्रीय विमा अधिनियम लोकप्रिय करण्यासाठी केला. पुढे इ.स. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धत जनसहयोग मिळवण्यासाठी जनसंपर्काचा वापर केला. इ.स. १८०७ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन यांनी संसदीय भाषणात जनसंपर्काला चालना दिली.

आय.व्ही. लेडबेटर ली यांच्या विचाराने जनसंपर्काचा पहिला पाया रचला गेला. त्यांनी कामगार यूनियन आणि मालक यांच्यातील जनसंपर्काच्या माध्यमातून सुसंवाद निर्माण केला म्हणून त्यांना 'जनसंपर्काचे जनक' म्हटले जाते.

इ.स. १९१८ च्या विश्व युद्धानंतर अमेरिकन राष्ट्र अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी 'जनमाहितीवरील' अमेरिकन मिश्नची स्थापना केली. इ.स. १९२६ मध्ये जनसंपर्काला एक परिपक्व व्यवसाय म्हणून मान्यता मिळाली. तसेच पुढे अमेरिकेमध्ये इ.स. १९६९ ला 'अमेरिकन जनसंपर्क सोसायटी' ची (पी.आर.एस.ए.) स्थापना केले. पश्चिम

युरोपात आणि जनसंपर्कास चालना मॅकॅवली यांच्या “जनतेचा आवाज म्हणजे ईश्वरीवाणी” (Vox Popuvli Vox Dei) घोषणाद्वारे मिळवली.

भारतात जनसंपर्क हा शब्द अर्वाचिन असला तरी अगदी पूराणात ही त्याचे दाखले मिळतात. रामाच्या रामराज्याची संकल्पना जनमतावर आधारलेली होती. श्रीकृष्णाची कौरव-पांडवा दरम्यानची शिष्टाई हा त्याचाच नमूना होता. हनुमानाने लंकेत अशीच रद्दबदली केली होती. अकबर बादशाहाने ही हिंदू-मुस्लिमांना एकत्र ठेवण्यासाठी ‘दिने-इलाही’ धर्माचा प्रचार केला. अगदी शंकरचार्याने केलेले भारत भ्रमण, संताची शिकवण आजच्या जनसंपर्काची त्यावेळची रुपे होते.

खऱ्या अर्थाने भारतात ब्रिटिशांनी संपर्क सुविधांचा प्रसार केला व जनसंपर्काला पाठबळ दिले. उदारमतवादी विचारवंत व उद्योगपतीनी आपल्या मतांचा प्रचार करण्यासाठी किंवा जनसहयोग मिळविण्यासाठी जनसंपर्कास प्रोत्साहन दिले. इ.स. १९१२ मध्ये जमशेटजी टाटा यांनी जमशेदपूरला सामुदायिक संपर्क कार्यक्रम सुरु केला. देशातील पहिला जनसंपर्क अधिऱ्याचा मान टाटाचे फिरोज उल्ला यांना जातो.

भारतातील जनसंपर्क संघटना इंग्लडसारखी आहे. इ.स. १९४२ ला भारतात सर्वप्रथम जनसंपर्क विभग स्थापन केला. इ.स. १९४७ ला नंतर स्वतंत्र भारतात याविभागात फेरबदल करून मंत्रालय बनविले. आज देशात जनसंपर्कासाठी स्वतंत्र मंत्रालय असून त्याला ‘माहिती व जनसंपर्क मंत्रालय म्हणून ओळखले जाते.

देशात केंद्रात ज्याप्रमाणे माहिती व जनसंपर्क मंत्रालय आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात माहिती व जनसंपर्क मंत्रालयाची स्थापना केली आहे. या मंत्रालयामार्फत जनसंपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करून देशाच्या ग्राम स्तरापर्यंत जनतेसोबत जनसंपर्क स्थापित केला जातो. अर्थात केंद्रीय पातळीपासून ग्रामीण स्तरापर्यंत प्रशासकीय संस्थेत जनसंपर्काची सूसूत्र व्यवस्था केल्याचे दिसते.

जनसंपर्काची संकल्पना :

जनसंपर्क ही संकल्पना व्यापक असून या संकल्पनेचा वापर सार्वत्रिक केला जातो. 'प्रचार, प्रसिद्धी, लोकव्यवहार, माहिती देणे. जाहिरात, कला या सर्वाचे एकत्रित सुव्यवस्थित रुप म्हणजे जनसंपर्क होय.' प्रो.जे.डी. मिलेट यांच्या मतानुसार "जनसंपर्क म्हणजे जनतेच्या इच्छा, अपेक्षा जाणून घेणे आणि त्या इच्छा अपेक्षांची पूर्ती प्रशासनाकडून कशी होते हे स्पष्ट करणे होय." तर जे.एल. मॅकमी यांच्या मतानुसार जनसंपर्क म्हणजे "शासनातील अधिकारी वर्ग व नागरिक यांच्या दरम्यान असलेली सर्व प्रथमिक व दुय्यम स्वरुपाचे संबंध आणि त्याद्वारे प्रस्थापित झालेले सर्व प्रभाव व प्रवृत्ती या सर्वांचा परस्पर प्रतिक्रियाचे मिश्रण जनसंपर्कात असते."

थोडक्यात, जनसंपर्क हे एक निरंतर आणि सुनियोजित व्यवस्थापकीय कार्य आहे. जनसंपर्काद्वारे सार्वजनिक व खाजगी संघटना आणि संस्था जनतेला योजनाबद्ध सर्वव्यापक माहिती पूरवून सकारात्मक सहाकार्य मिळवतात. प्रशासन आपल्या जनतेच्या समान हितांना सक्षमपणे अबाधित ठेवते आणि जनतेच्या मताचा आदर करून आपल्या ध्येय-धोरणांची बांधणी करते. लोकात विश्वास, सहानुभूती व सहकार्य जनसंपर्काद्वारे संपादित करण्यात येते.

लातूर जिल्ह्याची पार्श्वभूमी :

लातूर जिल्ह्याची स्थापना १६ ऑगस्ट १९८२ रोजी झाली आहे. १९८२ साली लातूर जिल्ह्याची स्थापन झाल्यानंतर या ठिकाणी विविध शासकीय व प्रशासकीय कार्यालयाची व्यवस्था करण्यात आली.

लातूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७१५७ चौ.कि.मी. इतके असून जिल्ह्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार २४,५५,५४३ एवढी होती. जिल्ह्यात १० तालुके असून एकूण गावे ९४७ एवढे आहेत.

लातूर जिल्ह्याची निर्मिती झाल्यापासून लातूर जिल्ह्यात प्रशासनाच्या दृष्टिने जिल्हा अधिकारी कार्यालयाची भूमिका महत्वाची राहिली आहे. लातूर जिल्ह्यात मुख्यतः जिल्हा अधिकारी कार्यालय आहे. प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र तहसिल असून महसुली कार्यालयासाठी प्रत्येक गावात सज्जा आहे. तसेच या सर्व प्रशासकीय यंत्रणेत जनसंपर्काचे स्थान महत्वाचे राहिले आहे. म्हणून “जिल्हा अधिकारी कार्यालयातील जनसंपर्क : एक अभ्यास” (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा) या संशोधन विषयाचे अध्ययन करण्याचे योजिले आहे.

समस्या सूत्रण :

आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचं युग म्हणून ओळखले जाते. यामुळे जनसंपर्काला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. प्रशासन आणि जनता यांच्यात परस्पर सामजंस्य निर्माण करण्याचे कार्य जनसंपर्क करते. आज जगातील प्रत्येक देशाने आपल्या प्रशासन व्यवस्थेत जनसंपर्काला प्रमुख स्थान दिले आहे. कारण प्रत्येक प्रशासकीय योजनांची यशस्विता लोकसहभागावर अवलंबून असते. त्यासाठी जनता व प्रशासन यांच्यात संपर्क प्रस्थापित करणे महत्वाचे ठरते.

भारतीय प्रशासन व्यवस्थेत केंद्रिय पातळीवरून ते ग्रामीण स्तरापर्यंत जनसंपर्काची प्रशासकीय रचना कार्यरत आहे. शासनाच्या वेगवेगळ्या कल्याणकारी योजनांची माहिती हि जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत दिली जाते. भारतीय प्रशासन व्यवस्थेत प्राचीन काळापासून जिल्ह्याला महत्व प्राप्त झाले आहे. जिल्हा हा केंद्र व राज्य शासनाचा दुवा म्हणून भूमिका पार पाडतो. जिल्हा हा प्रशासनातील महत्वाचा घटक असून सामान्य जनतेपर्यंत जिल्हा प्रशासनाची नाळ जोडली जाते.

“जिल्हा अधिकारी कार्यालयातील जनसंपर्क एक अभ्यास” (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा) हा संशोधन विषय अध्यायनास निवडण्यात आला आहे. कारण जिल्हा अधिकारी कार्यालयातील जनसंपर्काची प्रशासकीय रचना कशा प्रकारची असते?

जनसंपर्कासाठी कोणत्या यंत्रणेचा वापर केला जातो? या यंत्रणेत किंवा माध्यमात अत्याधुनिकता आहे काय? जनसंपर्काच्या नेमक्या कोणत्या समस्या आहेत? जनसंपर्काची उपयुक्तता जनससामान्यांना आहे काय? जनसंपर्क ही संकल्पनाप्रशासनाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचली आहे काय? असे अनेक प्रश्न मनात निर्माण झाले. याचा शोध घेण्यासाठी हा संशोधन विषय अध्ययनासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :

१) जनसंपर्क संकल्पना जाणून घेणे.

२) जनसंपर्कातील माध्यमाचा अभ्यास करणे.

३) भारतीय प्रशासनातील जनसंपर्क संघटन व कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

४) जिल्हा अधिकारी कार्यालयातील जनसंपर्काच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) जिल्हाधिकारी कार्यालयातील जनसंपर्काचे मुल्यमापन करणे.

संशोधन विषयाची गृहीतके :

१) जनसंपर्क ही द्वंद्वातमक प्रक्रिया आहे. शासन करत असलेल्या कार्याची माहिती जनतेला दिली जाते व जनतेच्या मागण्या, अपेक्षा शासनापर्यंत पोहचविल्या जातात.

२) जनसंपर्काच्या प्रभाविकतेवर शासनाच्या ध्येय धोरणांचे यशापयश अवलंबून असते.

३) जनसंपर्काप्रती प्रशासकीय यंत्रणेची उदासिनता आणि जनतेतील जागरुकतेचा अभाव या जनसंपर्क प्रक्रियतील प्रमुख समस्या आहेत.

४) जिल्हा अधिकारी कार्यालयाद्वारे जनसंपर्कासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. मात्र अपेक्षित परिणाम साधला जात नाही.

५) प्रभावी जनसंपर्कासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना निरंतर प्रशिक्षण व जनतेतील जनसहभागिता आवश्यक आहे.

संशोधन पद्धती :

"जिल्हाधिकारी कार्यालयातील जनसंपर्क : एक अभ्यास" विशेष संदर्भ लातूर जिल्हा या संशोधनविषयाच्या शास्त्रोक्त मांडणीसाठी विविध संशोधन पद्धती पैकी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे.

संशोधनाचे शीर्षक :

"जिल्हा अधिकारी कार्यालयांतील जनसंपर्क : एक अभ्यास" (विशेष संदर्भ लातूर जिल्हा).

संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी मराठवाड्यातील लातूर या जिल्ह्याची निवड केली आहे व लातुर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील जनसंपर्काचा अभ्यास केला आहे त्यामुळे संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र हे लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

माहिती संकलन :

तथ्या संकलनाच्या प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतापैकी संशोधनाच्या वस्तुनिष्ठ अध्ययनासाठी या दोन्हीही स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. यात प्राथमिक स्त्रोतातील मुलाखत अनुसूची या तंत्राचा आधार घेवून लातूर जिल्ह्यातील नागरिक व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून प्रत्यक्ष मुलाखत

अनुसूची देवून माहितीचे संकलन केले आहे. तसेच द्वितीय स्त्रोतात विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, पाक्षीके, त्रैमासिके, वर्तमानपत्रे शासनाचे दस्तावेज यांचा आधार घेवून संशोधन विषयाची मांडणी केली आहे.

नमुना निवड :

संशोधनात अधिकाधिक वस्तुनिष्ठता व पारदर्शकता यावी म्हणून नमूना निवड तंत्राच्या विविध तंत्रापैकी सहेतुक नमुना निवड तंत्राचा उपयोग केला आहे.

लातूर जिल्हा हा विस्ताराने खूप मोठा असल्याने तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी ही अधिक असल्याने नमुना म्हणून १०० नागरिक व १०० अधिकारी व कर्मचाऱ्याकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले आहे व नंतर विविध तक्ते, आलेखाच्या माध्यमातून त्याचे शास्त्रीय विश्लेषण कले आहे.

प्रकरणाची मांडणी :

१) प्रस्तावना

२) जनसंपर्क : संकल्पनात्मक विवेचन

३) भारतीय प्रशासनातील जनसंपर्क संघटन

४) जनसंपर्कः जिल्हा अधिकारी कार्यालयातील मूल्यमापन

५) निष्कर्ष व शिफरशी

निष्कर्ष व शिफरशी :

१) नागरिक वअधिकारी कर्मचारी यांच्यात सुंवाद व सौदार्दपूर्ण संबंध प्रस्थापित होण्यासाठी जनसंपर्क साधनाने प्रभावशाली भूमिका पार पाडली आहे.

२) जनसंपर्काशिवाय कार्यालयीन कामाचे स्वरुप, कार्यपद्धती व समस्यांचा व्यवस्थित निपटरा होवू शकत नाही.

३) लोकप्रशासनाचे यश हे जनसंपर्कावरच अवलंबून आहे.

४) भारताच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासात माहिती व जनसंपर्क मंत्रालयाची भूमिका अत्यंत महत्वाची राहिली आहे.

५) शासकीय ध्येय व धोरण ठरवण्यासाठी व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जनसंपर्कीय संवाद महत्वाचा ठरतो.

६) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे जनसंपर्कासाठी विविध साधनाचा वापर केला जातो, मात्र अपेक्षित परिणाम साधला जात नाही.

७) जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय यंत्रणेची जनसंपर्काप्रती उदासिनता तसेच जनतेतील जागरकतेचा अभाव या जनसंपर्क प्रक्रियेतील प्रमख समस्या आहेत. जनसंपर्क व्यवसायात तज्ञ मनुष्यबळाचा अभाव आहे. प्रभावी प्रशिक्षण व मर्यादित साधन सुविधा असल्याने जनसंपर्क व्यवसायात संधी असूनही विविध संस्थाना तज्ञ जनसंपर्क अधिकारी व कर्मचारी मिळत नाही.

८) शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमाची त्वरीत माहिती नागरिकांना लातूर जिल्हाधिकारी काया्रलयातील जनसंपर्क यंत्रणेमुळे होते, असे ३६ टक्के उत्तरदात्यांनी म्हटले तर ६२ टक्के उत्तरदात्यानी आम्हाला त्वरीत माहिती मिळत नाही असे म्हटले.

९) लातूर जिल्हाधिकारी कार्यालय जनसंपर्क साधण्यासाठी विविध साधनाचा उपयोग करते यात ४१ टक्के वर्तमानपत्रे, ३६ टक्के दुरदर्शन, १५ टक्के आकाशवाणी, ६ टक्के प्रत्यक्ष संपर्क आणि इतर साधणाचा उपयोग केवळ ०२ टक्के होतो.

१०) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शासकीय योजना १०० टक्के नागरीकापर्यंत पोहचतात असे ७८ टक्के अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांगितले, ५० टक्के पोहचतात असे १२ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले, २५ टक्के पोहचतात असे ०७ टक्के आणि १० टक्केच पोहचतात असे केवळ ०३ उत्तरदात्यांनी सांगितले.

११) शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा वापर होतो असे ९२ टक्के उत्तरदात्यांनी म्हटले तर केवळ ०८ टक्के उत्तर दात्यांनी प्रशिक्षित कर्मचाऱ्याचा वापर होत नाही असे म्हटले.

शिफारशी :

१) लातूर ल्हिाधिकारी कार्यालयातील प्रभावी जनसंपर्कासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना निरंतर प्रशिक्षण व जनतेतील सहभागीता वाढविणे आवश्यक आहे.

२) शासन प्रशासनाची वाढती कार्य व जबाबदारी आणि विकासाची नवनवीन क्षेत्रे यामुळे भारतीय प्रशसनाची दिशा व्यापक होत आहे. मात्र प्रशासकीय यंत्राला अपूरी पडत आहे. व लोकांच्या गरजा वाढत आहे. त्यामुळे लोकाच्या पर्यंत विविध सेवा आणि सुविधा पोहचविण्यासाठी प्रभावी जनसंपर्क यंत्रणा उभारणे गरजेचे आहे.

३) स्वंयसेवी संस्था आणि खाजगी उद्योग यांच्यातील परस्पर भागीदारी अनेक पातळयावर वाढत आहे अशा वेळी शासन आणि प्रशासनातील जनसंपर्क यंत्रणेचे अत्याधुनिकीकरण करणे गरजेचे आहे, तसेच अंतर्गत व बाह्य संवादाचा विचार करून नवा ग्राहक, नवा श्रोता व नवे समुह संबंध निर्माण करण्यावर भर देण्यास हवा.

४) नागरिक व प्रशासनाचा अधिकाअधिक जनसंपर्क व्हावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जनसंपर्काच्या सर्वच साधनाचा आधार घ्यावा.

५) सरकारी धोरणे, योजना व त्या संबंधीत मूलभूत माहितीच प्रसारण करण्यासाठी माहिती व प्रसारण मंत्रालयाने नागरिकाला समजेल अशा पद्धतीने विविध कार्यक्रम व उपक्रम राबवावे.

६) सरकारी योजना व कार्यक्रमाची यशस्विता तपासण्यासाठी व त्याचे मुल्यमापन करण्यासाठी या योजना व कार्यक्रमाबाबत नागरिकाकडून व या योजनांच्या उपभोक्त्याकडून फिडबॅक घेतला जावा.

७) जनसंपर्काच्या क्षेत्रात अधिकाधिक युवकांनी व तज्ज्ञानी यावे यासाठी शासनाने अशा जनसंपर्क कर्मचाऱ्यासाठी व अधिकाऱ्यासाठी विशेष सेवा आणि सुविधा निर्माण करून द्याव्यात.

८) जनसंपर्काच्या प्रभाविकतवर शासनाच्या ध्येय धोरणाचे यशापयश अवलंबून असते. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेची उदासिनता दूर करून नागरिकात जाणीव जागृती निर्माण करण्यास हवी.

९) केंद्र स्तरापासून ते जिल्हास्तरापर्यत जनसंपर्क यंत्रणेत प्रभावशाली समन्वय असावा व त्यांचे आपआपसात सौहर्दापूर्ण सेवध असावे ज्यामुळे त्यांची कार्य व्यवस्थित व परिणामकारक होण्यास मदत होईल.

१०) जनसंपर्क यंत्रणेने जनसंपर्क साधण्यासाठी ही अग्रेसर न राहता नागरिकांची ही तेवढीच जबाबदारी आहे. की प्रत्यक्ष जनसंपर्क विभागाशी संपर्क साधून योजना व कार्यक्रमाची माहिती मिळवणे

प्रस्तुत संशोधनासाठी ज्या गृहितकाची मांडणी केली होती ती सर्वच गृहितके सत्यावर पोहचली आहेत. यात मुख्यतः जनसंपर्क द्वंद्वात्मक प्रक्रिया आहे. शासन करत

असलेल्या कार्याची माहिती जनतेला दिली जाते व जनतेच्या मागण्या व अपेक्षा शासनापर्यंत पोहचविल्या जातात. उदा. सरकारी पातळीवरून जेव्हां एखाद्या धोरणाची आखणी केली जाते. तेव्हां त्या धोरणाच्या मसुद्यासंदर्भात नागरिकांच्या प्रतिक्रिया व पेक्षा यांची दखल घेतली जाते व त्याप्रमाणे सदरील धोरण दुरुस्त करण्याचा प्रयत्न सरकारी पातळीवरून होतो.

जनसंपर्काच्या प्रभाविकतेवर शासनाच्या ध्येय धोरणाचे यशअपयश अवलंबून असते हे गृहितक ही सत्य ठरले आहे. कारण जेव्हां जेव्हां सरकारी पातळीवरून किंवा प्रशासकीय पातळीवरून एखादा कार्यक्रम किंवा उपक्रम राबवायाचा असतो तेव्हां तो उपक्रम व कार्यक्रम सरकारी व प्रशासकीय कार्यालयातील जनसंपर्काची यंत्रणा कशा पद्धतीने राबविते ती जर सकारात्मकरित्या व आपले आद्य कर्तव्य समजून तिचा प्रभावी प्रचार आणि प्रसार केला तरच असे कार्यक्रम व उपक्रम जनतेपर्यंत पोहचू शकतात व त्यासंदर्भातील नागरिकांचे मत सकारात्मक अथवा नकारात्मक ठरत असते व यावरच असे धोरण, कार्यक्रम आणि उपक्रम हे यशस्वी झाले आहेत का अपयशी झाले आहेत. याबाबत सैद्धांतिक माहिती शासन व प्रशासनाला होते.

नागरिकांच्या हितार्थ जनसंपर्काची यंत्रणा केंद्रिय स्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत करण्यात आली आहे. मात्र आज ही यंत्रणा मनावी तशी आपली भूमिका पार पाडत नाही. किंबहूना नागरिकातील अजागृती, अज्ञान व अशिक्षितपणा या मुख्य समस्या आहेत. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे नागरिकांशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. मात्र तरीही अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत. ही वस्तूस्थिती अभ्यासाअंती स्पष्ट झाले आहे. अर्थात यास अनेक करणे कारणीभूत आहेत जसे की, जनसंपर्क अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळत असलेले अपूरे प्रशिक्षण, अपुऱ्यासेवा सुविधा तसेच सरकारी योजना आणि कार्यक्रमाप्रति नागरिकांचा उत्सर्पूत सहभाग नसणे तसेच त्यांचे नेहमीचे दुर्लक्ष कारणीभूत आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) Sharma M.P., Sudna B.L.- Public Administration in theory and Practice, Kitab Mahal, 22-A, Sarojini Naidu Marg, Allahabad.

२) Naidu S.P. – Public Administration Concept and Theory, New Age International (P) Ltd., Publisher, 4335/24, Ansari road, Dnyanganj, New Delhi-110002.

३) Sangeeta S. –Principle of Public Administration, Mangalam publisher and distributors, delhi-110053

४) Khera S.S. –district Administration in India, Asia Publishing House, New Delhi.

५) Rayadu C.S.-Media and Communication Management, Himalaya Publication house, Dr. Bhalerao Marg Girgaon, Mumbai-400004.

६) त्रिपाठी मधुसूदन-'भारत मे लोकप्रशासन', आमेगा पब्लिकेशन, दिल्ली प्रथमावृत्ती – २००६

७) बिहारी मंगल – 'प्रशासनिक चिंतन',रावत पब्लिकेशन्स, जयपूर, एवं नई दिल्ली, २००३

८) सिंह बोरकेश वर प्रसाद – 'लोकप्रशासन' ज्ञानदा प्रकाशन (पीएच.डी) नई दिल्ली, २००८

९) ओम प्रकाशसिंह - संचार माध्यमो का प्रभाव, क्लासिकल प्रकाशन नवी दिल्ली – १९९७

१०) अजित कुमार - स्वायत्तता को ग्रामीण जनता तक ले जाईये, संचार माध्यम – १९८९-१९९०

११) कुलश्रेष्ठ – जनसंपर्क प्रचार एवं विज्ञापन, राजस्थान प्रकाशन, जयपूर – १९८८

१२) सिंह महावीर - भारत मे जनसंवाद, प्रकाशन विभाग, संश्रूणा और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार

१३) कटारिया सुरेन्द्र - भारतीय लोकप्रशासन नेशनल, पब्लिशिंग हाऊस, जयपूर, नई दिल्ली.

१४) पुरोहित जालंदर – ‘जनसंपर्क’ हिमालय पब्लिकेशन, जयपूर मुबंई, प्रथमावृत्ती – २००८

१५) धारुरकर वि.ल. – विकास संवादाची नवी क्षितिजे, चैतन्य प्रकाशन औरंगबाद

संशोधक
बिडवे तुळशीदास शिवाजीराव

मार्गदर्शक
डॉ. प्रतिभा पाटील,
प्राध्यापक,
लोकप्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद